# कृषि पणन विषयक बातम्या : ऑगस्ट 2025

Sakal, 19/08/2025

## तेलंगण करणार फूल, फळांपासून मद्य

### प्रस्ताव तयार; शेतकऱ्यांना उपलब्ध होणार नवी बाजारपेठ

■ सकाळ न्यूज नेटवर्क

हैदराबाद, ता. १८ : टोमॅटो, आंबा, टरबूज आणि अननस यांसारख्या विविध प्रकारांच्या सहा फळांपासून मद्य बनवण्याच्या प्रस्तावावर तेलंगण सरकार विचार करीत आहे. याबाबतचा प्रस्ताव नुकताच तयार करण्यात आला आहे. यासाठी विद्यमान उत्पादन शुल्क नियमांनुसार अशा उत्पादकांसाठी आवश्यक असलेल्या नियमांवर आणि परवानगीसाठी अधिकारी काम करीत आहेत. फळे आणि फुलांपासून मद्य तयार करताना कोणती खबरदारी घ्यावी यावरही विचार सुरू आहे.

फुलांपासून बनवलेल्या 'वाइन'चे विविध 'ब्रँड' आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत, विशेषतः स्कॉटलंड, एस्टोनिया, दक्षिण आफ्रिका आणि स्पेनसारख्या देशांमध्ये खूप लोकप्रिय आहेत. या देशांमध्ये केवळ फुलांपासून बनवलेल्या 'वाइन'साठी विशेष बारदेखील आहेत. या नवीन प्रकारच्या दारूमुळे फळे, फुले आणि भाज्या पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना नवीन बाजारपेठा मिळतील, असे सांगितले जात आहे. तेलंगणमध्ये टोमॅटो आणि आंबा यांसारख्या फळांचे आणि फुलांचे उत्पादन जास्त होत असल्याने, त्यावर आधारित मद्य उद्योग स्थापन झाल्यास शेतकऱ्यांना चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे.

साधारणपणे द्राक्षांचा रस आणि बार्लीपासून मद्य तयार केले जाते. मात्र, आता नवीन प्रयोगांसह फुलांपासून जिन आणि फळांपासून मद्य तयार करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. 'चमेली', 'लॅव्हेंडर', 'गुलाब', 'मंदारिन' आणि 'चेरी ब्लॉसम' यांसारख्या फुलांपासून बनविलेले 'जिन'; तसेच आंबा, अननस, फणस आणि टोमॅटो यासारख्या फळांपासून बनविलेली वाइनदेखील बाजारात विशेष स्थान मिळवत आहेत. फुलांच्या पाकळ्यांपासून बनवलेला 'फ्लोरो जिन' देखील लवकरच बाजारात येणार आहे. इंग्लंड, जपान, स्कॉटलंड आणि इटलीसारख्या देशांमध्ये या प्रकारची वाइन आधीच लोकप्रिय आहे. लवकरच तेलंगणामध्येही ही चव लोकप्रिय करण्याचा निर्मात्यांचा विचार आहे.



### अशी आहे बाजारपेठ

एका अहवालानुसार, सन २०२३ मध्ये फळ आणि फुलांच्या वाइनच्या बाजारपेठेतील उलाढाल ३.४ अब्ज डॉलर होती आणि २०३२ पर्यंत ती ५.७ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. भारत, फिलिपिन्स आणि थायलंडमध्ये 'मँगो वाइन' विकली जाते. अननस वाइन ब्राझीलमध्ये लोकप्रिय आहे. केरळ आणि श्रीलंकेतून फणसाची वाइन निर्यात केली जाते. टरबूज वाइन ही अमेरिका आणि मेक्सिकोमध्ये खूप लोकप्रिय आहे.

### नैसर्गिक सुगंध कायम

फुले, फळे आणि भाज्यांपासून बनवलेली ही वाइन तिचा नैसर्गिक सुगंध न गमावता तयार केली जात आहे. ती वाइनप्रेमींना आकर्षित करत आहे. प्रत्येक देशात स्थानिक पातळीवर आढळणारी वेगवेगळी फुले 'जिन' तयार करण्यासाठी वापरली जातात. या प्रकारच्या पेयांमध्ये अल्कोहोलचे प्रमाण १८ ते ३८ टक्क्यांपर्यंत असते.

Agrowon, 17/08/2025

# कृषी निर्यात चार लाख कोटींवर

## पंतप्रधान नरेंद्र मोदी : आत्मनिर्भर अन् विकसित भारताचा रोडमॅप सादर



नवी दिल्ली (वृत्तसंस्था) : "कृषी क्षेत्र हे देशाच्या विकासाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. दूध, डाळी आणि ताग उत्पादनात भारत जगात पहिल्या स्थानावर, तर तांदूळ, गहू, कापूस, फळे आणि भाजीपाला उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर आहे. देशाची कृषी निर्यात चार लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे, ही बाब देशाच्या जागतिक स्पर्धेतील क्षमतेचे प्रतिबिंब आहे," अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचा रोडमॅप सादर केला.

७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लाल किल्ल्यावरून पंतप्रधान मोदी यांनी देशाला संबोधित केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले, "मागील आठ वर्षांत वस्तू व सेवा करामुळे (जीएसटी) देशातील करप्रणालीत मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्या. विविध करांचे ओझे कमी झाले. त्यानंतर आता आठ वर्षांनंतर काळाची गरज लक्षात घेता, जीएसटीमध्ये नव्याने सुधारणा करण्यात येणार असून, जीवनावश्यक वस्तूंवरील कर मोठ्या प्रमाणात कमी केले जाणार आहेत. सर्वसामान्य ग्राहकांसह स्थानिक विक्रेते तसेच सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना त्याचा मोठा फायदा होईल. येत्या दिवाळीपर्यंत ही देशवासीयांसाठी मोठी भेटवस्तू असेल," अशी घोषणा त्यांनी केली.

पंतप्रधान म्हणाले, "विविध गोष्टींसाठी इतरांवर असलेले अवलंबित्व देशाच्या स्वातंत्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. त्यामुळे देशाला स्वावलंबी होण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत. स्वावलंबन हे केवळ आयात-निर्यात, रुपया-डॉलरसंदर्भात नव्हे, तर आपल्या क्षमतांबद्दल असायला हवे. त्यामुळे या वर्षअखेरपर्यंत भारताची पहिली मेड इन इंडिया सेमीकंडक्टर चिप बाजारात आणली जाणार आहे. तसेच अणुऊर्जा क्षेत्र खासगी कंपन्यांसाठी खुले करीत पुढील दोन दशकांमध्ये अणुऊर्जेचे उत्पादन दहापटीने वाढवले जाईल. त्यातून देशाला ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी खोल समुद्रात इंधनासाठी शोधमोहीम हाती घेतली जाईल. सौर, पवन, जलविद्युत आदी पारंपरिक ऊर्जास्रोतांना बळकट करून परदेशी इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी केले जाईल. हे एकप्रकारे स्वतंत्र आणि शक्तिशाली भारताच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असेल."

### तीन कोटी युवकांना रोजगार

तरुणांची सर्वाधिक लोकसंख्या ही देशाची संपत्ती म्हणून ती अधिक विकसित करण्यासाठी आणि युवा वर्गाच्या सक्षमीकरणासाठी पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजना राबवण्यात येणार आहे. सुमारे एक लाख कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे. याअंतर्गत नव्याने खासगी रोजगार मिळालेल्या युवकांना दरमहा १५ हजार रुपये दिले जातील. तीन कोटी युवकांना रोजगार देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

### खोट्या धमक्यांना भीक घालणार नाही

'ऑपरेशन सिंदूर' हे भारताच्या धोरणात्मक स्वायत्ततेचे उत्तम उदाहरण होते, अशा शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी भारतीय लष्कराची प्रशंसा केली. भारतात विकसित शस्त्रास्त्रांचा वापर करून दहशतवादाचे अड्डे आणि दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानातील पायाभूत सुविधा उद्ध्वस्त केल्या. इतर देशांच्या सल्ल्याने पाकिस्तानकडून दिल्या जाणाऱ्या अणुबॉम्बच्या पोकळ धमक्यांना भीक घालणार नाही. सिंधू जल करार हा भारतासाठी अन्यायकारक होता. भारतात उगम पावणाऱ्या नद्यांच्या पाण्यावर शत्रू देशाला सिंचनाची सुविधा मिळत होती आणि इकडे मात्र आपला शेतकरी दुष्काळाचा सामना करीत आहे. मागील सात दशके भारत हा अन्याय सहन करीत आला. आता मात्र ते सहन केले जाणार नाही, अशा शब्दांत पाकिस्तानला इशारा दिला.

Agrowon, 14/08/2025

# दापचरी येथील जागेसाठी ११ सदस्यीय समिती

## आंतरराष्ट्रीय बाजार उभा करण्यासाठी दुग्धविकासची जागा पणन विभागाला

अॅग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : आंतरराष्ट्रीय बाजार उभा करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाची दापचरी (ता. डहाणू) येथील जागा हस्तांतरित करण्यासाठी पालघर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे.

राज्यातील बाजार समित्यांबाबत नेमण्यात आलेल्या दांगट समितीने मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीला पर्याय असलेला आंतरराष्ट्रीय बाजार उभा करावा अशी शिफारस केली होती. या शिफारशी राज्य सरकारने स्वीकारल्या होत्या. त्यानुसार मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. यासाठी पशुसंवर्धन विभागाची दापचरी येथील जागा घेण्याचा निर्णय झाला आहे. मात्र, ही जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित केल्यानंतर ती पणन विभागाकडे वर्ग केली जाईल. त्यासाठी योग्य प्रक्रिया राबविण्यासाठी पालघरच्या जिल्हाधिकारी इंदूराणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीत पणन संचालक, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक, डहाणूचे उपविभागीय अधिकारी, पालघरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, पालघर जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, सहायक दुग्ध आयुक्त, पालघर भूमी अभिलेख अधिकारी, एमआयडीसीचे ठाणे प्रादेशिक अधिकारी आणि दापचर दुग्ध प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी हे या समितीचे सदस्य असतील. पालघरचे जिल्हा उपनिबंधक या समितीचे सदस्य सचिव असून ही समिती एक महिन्यात आपला अहवाल सरकारला सादर करणार आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या दापचरी दुग्ध प्रकल्पाची जमीन आंतरराष्ट्रीय कृषी बाजार उभारणीसाठी पणन मंडळास देण्यासंदर्भात ही समिती अभ्यास करणार आहे.

### आयात-निर्यातीच्या दृष्टीने उभारणी

दापचरी येथील पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विभागाची ८०० एकरांहून अधिक जागा आहे. या जागेवर हा प्रकल्प उभा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. नजीकच्या काळात वाढवण बंदर विकसित होणार असून बंदरातून होणारी शेतीमालाची आयात व निर्यातीच्या दृष्टीने दापचरी येथे बाजार उभारणी करण्याचे नियोजन सरकारने केले आहे.

Lokmat, 12/08/2025

# देशातील पहिली जागतिक बाजारपेठ वाढवणमध्ये

## फ्रान्सच्या प्रख्यात कंपनीचे सहकार्य, 'पणन'चा मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** देशातील पहिली जागतिक बाजारपेठ पालघर जिल्ह्याच्या वाढवणमध्ये उभारण्यात येणार असून, दृष्टीने हालचालींना वेग आला आहे. पणन विभागाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तसा प्रस्ताव पाठविला असून, त्यावर तातडीने पावले उचलण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

शेतमाल बाजार समित्यांमध्ये येतो आणि तेथून तो ग्राहकांपर्यंत पोहोचतो, ही आजवरची व्यवस्था. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ महाराष्ट्रातच उपलब्ध व्हावी, असा प्रयत्न आजवर झाला नाही. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलरची करण्याचे उद्दिष्ट मुख्यमंत्री फडणवीस यांनी समोर ठेवले आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी कृषी क्षेत्राचे मोठे योगदान घ्यायचे तर कृषीमाल देशाबाहेर जाणे आणि त्यातून अर्थव्यवस्था मजबूत करणे आवश्यक आहे. पणन मंत्री जयकुमार रावल हे नुकतेच पॅरिसला गेले होते. तेथील जगप्रसिद्ध रुंजिस मार्केटने महाराष्ट्रात जागितिक बाजारपेठ उभी करण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आणि परस्पर सामंजस्य कराराचा मसुदादेखील पणन विभागाकडे पाठविला आहे. या बाजारपेठेची केवळ फळे, भाजीपाल्याची वार्षिक उलाढाल २२ हजार कोटी रुपयांची आहे.



### जागेसाठी चाचपणी सुरू

वाढवणमध्ये भव्य बंदराची उभारणी केली जाणार आहे. सोबतच तेथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारले जाणार आहे. शिवाय, वाढवणपासून समृद्धी महामार्गाला जोडणारा मार्गही बांधण्यात येणार आहे.

**त्यामुळे देशांतर्गत आणि विदेशांशी जोडले जाणारे आदर्श ठिकाण म्हणून वाढवणचा विकास होणार आहे. हे लक्षात घेता, तेथे जागतिक बाजारपेठ साधारणतः पाचशे एकरांत उभारून अत्याधुनिक सुविधा दिल्या जातील. त्यात कृषी मालाची साठवणूक, प्रक्रिया, पॅकेजिंग आदींची जागतिक दर्जाची सुविधा असेल.**

वाढवणमध्ये त्या दृष्टीने जागेसाठीची चाचपणीही पणन विभागाने सुरू केली आहे. या बाजारपेठेतून कृषीमाल हा काही तासात परदेशात पोहोचविता येणार आहे. त्याचवेळी नवी मुंबई परिसरात अशी बाजारपेठ उभारण्याचा पर्यायदेखील खुला ठेवला आहे.

### बाजार समित्यांचे सचिव राज्य सरकार नेमणार?

मुंबई, नागपूरसारख्या अत्यंत निवडक कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे सचिव हे राज्य सरकारचे अधिकारी असतात. मात्र, अन्य बहुतांश बाजार समित्यांमध्ये सचिवाची नेमणूक हे तेथील संचालक मंडळ नेमते. या पार्श्वभूमीवर बाजार समिती सचिवांचे एक केडर तयार करून सचिवांच्या नियुक्त्या या राज्य सरकार करेल, असा प्रस्ताव आहे.

"

पणन व्यवस्था म्हणजे बाजार समित्या हे वर्षानुवर्षांचे सूत्र. ते कायम ठेवत जागतिक पटलावर महाराष्ट्राला नेण्यासाठी जागतिक बाजारपेठेची नितांत आवश्यकता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशांनुसार आमचा विभाग या संकल्पनेवर आता काम करत आहे.

**जयकुमार रावल,**
पणन मंत्री.

Pudhari, 11/08/2025

# नव्या उमेदीने कृषी क्रांतीची वाटचाल

१९६० च्या दशकापूर्वी भारताच्या कृषी क्षेत्रात स्थिरता आणि अन्नसुरक्षेचा अभाव दिसून येत होता. आता मात्र ही परिस्थिती बदलली असून, आज देशाची अन्नधान्याची गरज पूर्ण करून अतिरिक्त उत्पादन घेतले जात आहे. या बदललेल्या स्थितीने 'लोकसंख्यावाढीमुळे अन्नधान्याचे उत्पादन कमी होईल' या माल्थसच्या सिद्धांताला चुकीचे सिद्ध केले असल्याचे निश्चितच म्हणता येईल. १९६७ मध्ये विल्यम आणि पॉल पॅडॉक यांनी भारतात दुष्काळ पडेल असे भाकीत केले होते. भारत वाढत्या लोकसंख्येची पुरेशा अन्नाची गरज भागवू शकणार नाही, असा दावा त्यांनी केला होता. इतकेच नाही, तर अन्नविषयक मदत देत राहिल्यास भविष्यात उपासमार आणखी वाढेल, असा वादग्रस्त दावाही त्यांनी केला होता. जास्त उत्पादन देणाऱ्या भात आणि गव्हाची वाणे, कृषी रसायने आणि सिंचन अशा उपाययोजनांच्या माध्यमातून भारताने घडवून आणलेल्या हरित क्रांतीने पॅडॉकचा अंदाज चुकीचा ठरवला असल्याचे समजून घ्यायला हवे. यामुळेच तर १९६६ - ६७ मध्ये ७४ दशलक्ष टन इतकेच असलेले भारताचे अन्नधान्य उत्पादन १९७० - ८० पर्यंत १३० दशलक्ष टनांपर्यंत वाढले होते. दुसरीकडे २०१४ - २०१५ या काळातही या बाबतीत वार्षिक वाढ ८.१दशलक्ष टन इतकी होती. त्यामुळे भारताचे एकूण अन्नधान्य उत्पादन ३५४ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचले. १९६० च्या दशकात भारताचे बागायती पिकांचे उत्पादनही ४० दशलक्ष टन इतकेच होते, तर २०२४ -२५ मध्ये ते वाढून ३३४ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचले. या अलीकडच्या काळातील वार्षिक वाढ होती सुमारे ७.५ दशलक्ष टन. कोणत्याही परिस्थितीचा मारा सोसू शकणारी पिकांची वाणे आणि शेतीच्या लवचिक पद्धतींमुळे आता पीक उत्पादनातही अधिक स्थैर्य आले आहे.

भारताच्या दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन आणि

**कृषी क्षेत्रात सातत्याने होत असलेल्या सुधारणा आणि शेतकरी केंद्रित योजनांमुळे कृषी क्षेत्रात सातत्यपूर्ण प्रगती झाली आणि याचमुळे देशात भात, गहू, मका, भुईमूग आणि सोयाबीनचे विक्रमी उत्पादन घेतले गेले आहे. महत्त्वाचे म्हणजे, प्रमुख कृषी पिकांच्या उत्पादनाच्या तिसऱ्या अग्रिम अंदाजानुसार, २०२४- २५ या कृषी वर्षात एकूण अन्नधान्य उत्पादन ३५३.९६ दशलक्ष टन होण्याचा अंदाज आहे. हे आतापर्यंतचे सर्वाधिक अन्नधान्य उत्पादन असेल.**

मत्स्यपालन क्षेत्रातही उल्लेखनीय वाढ झाली असल्याचेही समजून घ्यावे लागेल. भारतात १९७० च्या दशकात श्वेत क्रांतीला सुरुवात झाली होती. यामुळे युरोपाशी बरोबरी साधत भारताचे दुधाचे उत्पादनही २० दशलक्ष टनांवरून २०२३ - २४ पर्यंत २३९ दशलक्ष

**- शिवराज सिंह चौहान**

केंद्रीय कृषिमंत्री

टनांपर्यंत वाढले. त्या बरोबरीनेच १९८० च्या दशकात भारतात नील क्रांतीलाही सुरुवात झाली. यामुळे मत्स्योपादनही २.४ दशलक्ष टनांवरून २०२४ -२५ पर्यंत १९.५ दशलक्ष टनांपर्यंत वाढले. या प्रगतीमुळेच तर आज भारत सागरी खाद्यान्नाच्या बाबतीत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा उत्पादक आणि निर्यातदार देश बनला आहे. इतकेच नाही, तर कुक्कुटपालनही केवळ घरातून चालणारा व्यवसाय राहिला नसून आता एक मोठा उद्योग बनला आहे. याच काळात भारतातील अंड्यांचे उत्पादनही १० अब्जांवरून १४३ अब्जांपर्यंत पोहोचले आहे, तर त्याचवेळी पोल्ट्री मांसाचे उत्पादनही ११३



हजार टनांवरून ५,०१९ हजार टनांपर्यंत वाढले.

भारतात २०१४ - १५ ते २०२३ - २४ या काळात प्राणीजन्य खाद्यान्न उत्पादनातही अभूतपूर्व वाढ पाहायला मिळाली आहे. या काळात दुधाचे उत्पादन वार्षिक १०.२ दशलक्ष टनांनी, अंड्यांचे उत्पादन ६.८ अब्ज एककाने, ब्रॉयलर मांसाचे उत्पादन २१७ हजार टनांनी आणि माशांचे (मुख्यतः मत्स्यशेती) उत्पादन०.७८ दशलक्ष टनांनी वाढले. ही वाढ झाली ती प्रामुख्याने प्रजनन तंत्रज्ञान, संसाधन व्यवस्थापन आणि कुशल मनुष्यबळामुळे. फळे, भाजीपाला आणि प्राणीजन्य खाद्यान्न उत्पादने यासारख्या उच्च - मूल्याच्या खाद्यान्न उत्पादनांमधील या वाढीचे प्रमाण आता अन्नधान्य उत्पादनापेक्षाही जास्त आहे. या प्रगतीमधून कृषी क्षेत्रात घडवून आणलेले वैविध्यकरण, पोषण सुधारणा, शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि हवामान बदलांचा सामना करण्याची क्षमता या सर्वांमध्ये तंत्रज्ञानाने बजावलेली महत्त्वाची भूमिकाही ठळकपणे अधोरेखित होते.

भारताच्या खाद्यान्न उत्पादन क्षेत्रातील या यशामधून पोषण, शेतकऱ्यांचे उत्पन्न, हवामान बदलांचा सामना करण्याची क्षमता आणि निर्यातीतील वाढ अशा सर्व बाबतीत तंत्रज्ञान आणि धोरणांना बजावलेली परिवर्तनीय भूमिकाही ठळकपणे दिसून येत असल्याचे समजून घ्यावे लागेल. भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आयसीएआर) केलेल्या संशोधनानुसार, केंद्र सरकारने क्षेत्रात गुंतवलेल्या प्रत्येक रुपयावर १३.८५ रुपये इतका, तर कृषी विषयक संशोधन आणि विस्तारासाठी गुंतवलेल्या प्रत्येक रुपयावर ७.४० रुपये इतका भरघोस परतावा मिळतो आहे. पंतप्रधान कृषी सिंचन योजना, शेतकरी सन्मान योजना अशा केंद्र सरकारने अलीकडच्या काळात सुरू केलेल्या योजना, तसेच राष्ट्रीय पशुधन मिशन आणि नील क्रांतीसारख्या उपक्रमांमुळे संसाधनाच्या वापरात सुधारणा घडून आली आहे, जोखीम कमी झाली आहे आणि कृषी-अन्न व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा वापर वाढून कृषी क्षेत्राच्या प्रगतीला अधिक बळकटी मिळाली आहे.

भारताने २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचा संकल्प केला आहे. तोपर्यंत भारताची अंदाजित लोकसंख्या १.६ अब्ज असेल आणि यापैकी निम्मी लोकसंख्या शहरी भागात असेल, हे गृहितक जमेस धरले, तर हा संकल्प साकार करण्यासाठी भारताच्या अर्थव्यवस्थेचा वार्षिक वाढीचा दर ७.८ टक्के इतका असणे आवश्यक आहे. लोकसंख्येतील या बदलांमुळे एकूण अन्नधान्याची मागणी दुप्पट होईल. महत्त्वाचे म्हणजे, फळे, भाजीपाला आणि प्राणीजन्य खाद्यान्नांची मागणी तिप्पट होण्याचा अंदाज आहे, तर त्याचवेळी तृणधान्यांची मागणी मात्र स्थिर राहील आणि यामुळे देशाची गरज भागवूनही अतिरिक्त उत्पादन उपलब्ध राहू शकेल. खरे तर, वाढत्या शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे लागवडीखालील जमीन १८० दशलक्ष हेक्टरवरून १७६ दशलक्ष हेक्टरपर्यंत कमी होईल आणि सरासरी जमीनधारणा १ हेक्टरवरून ०.६ हेक्टरपर्यंत कमी होईल. यामुळे पाणी आणि कृषी रसायनांवरचा ताण वाढण्याचा आणि परिणामी संसाधनांचा ऱ्हास होण्याचा धोका आपल्याला नाकारता येणार नाही. याच्या जोडीनेच शाश्वत शेती आणि ग्रामीण उपजीविकेसाठी हानिकारक ठरू लागलेला हवामान बदलाचा आणखी मोठा धोका कायम असल्याचेही लक्षात घ्यावे लागेल.

Sakal, 09/08/2025

सकाळ अ‍ॅग्रोवन
शनिवार, ९ ऑगस्ट २०२५



# कांदा साठवणूक धोरणाचा मसुदा तयार : पाशा पटेल

अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : राज्य सरकारने नेमलेल्या कांदा धोरण समितीकडून कांद्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी पावले उचलली जात आहेत. या पार्श्वभूमीवर कांदा साठवणूक धोरणाचा मसुदा तयार केला असल्याची माहिती राज्य कृषी मूल्य आयोगाचे आणि कांदा धोरण समितीचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली.

येथील राष्ट्रीय कांदा आणि लसूण संशोधन केंद्रामध्ये गुरुवारी (ता.७) पार पडली. त्या वेळी ते बोलत होते. कांद्याच्या प्रश्नांचे उपगट तयार केल्यानंतर 'कांद्याची साठवणूक' या विषयावर ही बैठक आयोजित केली होती.

या वेळी राष्ट्रीय कांदा व लसूण संशोधन केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. राम दत्ता, महाराष्ट्र राज्य पणन मंडळाचे संचालक संजय कदम, कांदा निर्यातदार दानीश शहा, शेतीमाल अभ्यासक दीपक चव्हाण, लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सुवर्णा जगताप, भीमाशंकर फार्मर प्रोड्यूसर कंपनीचे बाळासाहेब सामंत पाटील, महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. आर. बी. हिले, शेतकरी प्रतिनिधी दीपक पगार उपस्थित होते.



पुणे : कांद्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी कांदा लसूण संशोधन संचालनालय आणि कला बायोटेक यांच्या संयुक्त विद्यमाने उभारलेल्या कंट्रोल ओनियन स्टोअरेज स्ट्रक्चरच्या केंद्राला कांदा धोरण समितीच्या सदस्यांनी भेट दिली.

श्री. पटेल म्हणाले, की देशाची जवळपास १६० ते १९० लाख टन कांद्याची गरज आहे. साठवणूक आणि वाहतुकीमध्ये ८० ते ९० लाख टन कांदा खराब होतो, ही बाब गंभीर आहे. साठवणुकीच्या सुविधा सक्षम झाल्या तर निर्यातीसाठी कांदा उपलब्ध होईल. नव्या खांदा साठवणूक पद्धतीमध्ये २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमानात ६० ते ६५ टक्के आर्द्रता आणि खेळती हवा राहण्याची रचना केली आहे. या नवीन तंत्रज्ञानामुळे साठवणुकीमध्ये कांद्याचे कोंब येणे, सडणे, वजनातील घटीचे प्रमाण अत्यल्प राहते, असा शास्त्रज्ञांचा दावा आहे.

कांदा विकिरण तंत्रज्ञान आणि कोल्ड स्टोअरेज या साठवणीच्या दोन्ही पद्धती महागड्या असून कांद्याचे सरासरी भाव आणि त्यासाठी लागणारी गुंतवणूक आणि प्रति टन खर्चदेखील अव्यवहार्य असल्याचे यावेळी समितीच्या चर्चेतून पुढे आले.

Agrowon, 09/08/2025



# ई-नाम प्रणालीद्वारे पुण्यातून काश्मीरमधील फळांची खरेदी

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : काश्मीरमधील शोपिया बाजार समितीतून ई-नाम प्रणालीचा वापर करत पुणे बाजार समितीमधील श्री गुरुदेव दत्त एजन्सीचे व्यापारी सुयोग सूर्यकांत झेंडे यांनी सफरचंद, पिअर या दोन फळांची खरेदी केली. त्यांनी एकूण ११.६ टन खरेदी केली असून, त्याची किंमत ११ लाख ७६ हजार असल्याचे कृषी लाख ७५ हजार असल्याचे पणन मंडळातील सूत्रांनी सांगितले.

ई-नाम इंटरस्टेट ट्रेड अंतर्गत दोन राज्यांतील बाजार समित्यांमध्ये ई-लिलावाद्वारे शेतीमालाची खरेदी-विक्री करता येते. पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या मार्गदर्शनाखाली काश्मीरमधील सफरचंद, पिअर, प्लम खरेदीसाठी प्रयत्न सुरू होते. त्यानुसार पहिल्यांदा मंगळवारी काश्मीर आणि पुणे बाजार समितीत खरेदी झाली. काश्मीरप्रमाणे अन्य राज्यातही ई-नामद्वारे खरेदी-विक्रीचे प्रयत्न सुरू असल्याचे पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी सागितले.

## राज्यात २१ हजार ५८२ कोटींची उलाढाल

शेतीमाल खरेदी-विक्रीसाठी देशपातळीवर एक बाजार या केंद्राच्या संकल्पनेवर आधारीत राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) ही योजना सुरू आहे. महाराष्ट्रासह २३ राज्ये, राज्ये, तसेच ४ केंद्रशासित प्रदेशातील १५२२ बाजार समित्या 'ई-नाम'ला जोडल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील १३३ बाजार समित्या चार टप्प्यांमध्ये जोडल्या आहेत. राज्यात याद्वारे एकूण ५७८ लाख क्विंटल शेतीमालाची विक्री झाली असून याची किंमत २१ हजार ५८२ कोटी रुपये आहे.

> शेतीमालाच्या ई-नाम खरेदी-विक्रीची रक्कम अडत्यांमार्फत थेट ई-पेमेंटद्वारे होते. त्यामुळे शेतीमालाचा ऑनलाइन व्यापार-व्यवहार अधिक पारदर्शक होईल. यामुळे आंतरराज्य व्यापारास चालना मिळाली आहे. ई-लिलावाद्वारे सोयाबीन, हरभरा, मका, गहू, ज्वारी, हळद, तर, उडीद, कांदा, डाळिंब, कोबी, रेशीम कोष आणि फळांची विक्री होत आहे. या प्रणालीद्वारे बाजार समित्यांतील व्यापारी, शेतकऱ्यांनी आंतरराज्य व्यापारांत जास्तीत जास्त सहभाग घ्यावा.
>
> **- संजय कदम,**
> कार्यकारी संचालक,
> राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

Sakal, 08/08/2025

# रेशीमकोषांची कोटीची उलाढाल


## बारामती बाजार समितीत २२२ शेतकऱ्यांकडून २३ टनांची विक्री

**काटेवाडी, ता. ७ : बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रेशीमकोष बाजारात २६ जून ते २५ जुलै या कालावधीत १ कोटी १६ लाख ८१ हजार ५८६ रुपयांची विक्रमी उलाढाल झाली आहे. २२२ शेतकऱ्यांनी विक्री केलेल्या २३ टन रेशीमकोषांना प्रतिकिलो ५०० ते ५५० रुपये असा उच्चांकी बाजारभाव मिळाला. यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले आहे. मागील महिन्यात १४ रिलर्सनी या खरेदी-विक्रीत सहभाग घेतला.**

एप्रिल २०२२ पासून सुरू झालेल्या बारामती रेशीमकोष बाजारपेठेने आतापर्यंत तीन हजार ६३ शेतकऱ्यांना आपले २४७ टन ११४ किलो रेशीम कोष विक्रीची संधी उपलब्ध करून दिली आहे. या कालावधीत १२ कोटी ८ लाख ३२ हजार १३५ रुपयांची एकूण उलाढाल झाली आहे. पुणे, सातारा, अहिल्यानगर, बीड आणि छत्रपती संभाजी नगर यासह राज्यभरातील शेतकरी या बाजारात आपले कोष विक्रीसाठी आणत आहेत. येथील १४ रिलर्सनी या खरेदी-विक्रीत सहभाग घेतला, जे ई-नाम प्रणालीच्या वेबसाइटवर नोंदणीकृत आहेत.

### ई-नामद्वारे पारदर्शक व्यवहार

बारामती रेशीम बाजारात ई-नाम प्रणालीद्वारे ऑनलाइन लिलाव आणि पारदर्शक व्यवहार होतात. अचूक वजन आणि व्यवस्थित विक्री प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना इतर राज्यांतील बाजारांप्रमाणे चांगले दर मिळत आहेत. बाजार समितीचे सभापती विश्वास आटोळे आणि उपसभापती रामचंद्र खलाटे यांनी शेतकऱ्यांना ग्रेडिंग आणि स्वच्छ केलेले रेशीम कोष बाजारात आणण्याचे आवाहन केले आहे. यामुळे कोषांना जास्त दर मिळण्यास मदत होते.



**बारामती :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रेशीम बाजारामध्ये विक्रीसाठी ठेवलेले रेशीमकोष.

ऑनलाइन लिलाव, पारदर्शक व्यवहार आणि अचूक वजन यामुळे शेतकरी बारामती रेशीम बाजाराकडे आकर्षित होत आहेत. शासनाच्या पाठिंब्याने बारामती मुख्य यार्डमध्ये रेशीमकोष बाजारपेठ आणि कोषोत्तर प्रक्रिया व प्रशिक्षण इमारतीचे बांधकाम सुरू आहे. यामुळे भविष्यात शेतकरी आणि रिलर्स यांना सर्व आवश्यक सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असून, बारामती रेशीम बाजार एक भव्य आणि अग्रगण्य बाजारपेठ बनणार आहे.

**-अरविंद जगताप, सचिव, बारामती बाजार समिती**

पुढारी

पुढारी ANCHOR


# काश्मीरमधील सफरचंद, पिअर्सची ई-नामद्वारे पुण्यातून खरेदी

## एकूण ११.७६ लाख रुपयांच्या ११.६ टन मालाची खरेदी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**जम्मू-काश्मीर येथील शोपियां या बाजार समितीमधून ई-नामद्वारे येथील पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमधील व्यापारी सुयोग सूर्यकांत झेंडे (श्री गुरुदेवदत्त एजन्सी) यांनी सफरचंद व पिअर या दोन शेतमालाची खरेदी केली. याप्रमाणे एकूण ११.६ टन शेतमालाची खरेदी केली असून या खरेदीची किंमत ११.७६ लाख रुपये असल्याचे राज्य कृषी पणन मंडळाकडून सांगण्यात आले.**

> कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतमालाच्या ई-नामद्वारे होणाऱ्या शेतमाल व्यापारातील विक्रीची रक्कम अडत्यांमार्फत थेट ई-पेमेंटद्वारे करण्याची सुविधा समाविष्ट आहे. त्यामुळे शेतमालाची ऑनलाइन व्यापार-व्यवहारात अधिक पारदर्शकता आली असून राज्यांतर्गत व्यापार वाढीस चालना मिळाली आहे. ई-लिलावाद्वारे सोयाबीन, हरभरा, मका, गहू, ज्वारी, हळद, तूर, उडीद, कांदा, डाळिंब, कोबी, रेशीमकोष आणि फळांची विक्री होत आहे. त्यामुळे राज्यातील ई-नाम बाजार समित्यामधील व्यापारी व शेतकऱ्यांनी आंतरराज्यीय व्यापारामध्ये जास्तीत जास्त सहभाग घ्यावा.
>
> - **संजय कदम,** कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ,पुणे.



ई-नाम इंटरस्टेट ट्रेडअंतर्गत दोन राज्यातील बाजार समित्यांमध्ये ई-लिलावाद्वारे शेतमालाची खरेदी-विक्रीकरता येते. इंटरस्टेट ट्रेडला चालना देण्यासाठी पणनमंत्री जयकुमार रावल आग्रही आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जम्मू-काश्मीर येथील सफरचंद, पिअर व प्लम या शेतमालाची ई-नाममार्फत इंटरस्टेट ट्रेड करण्याबाबत कार्यवाही सुरू होती. त्याप्रमाणे पहिल्यांदा ५ ऑगस्ट २०२५ रोजी पुण्यात या शेतमालाचा व्यापार झाला आहे.

ई-नाममुळे जम्मू-काश्मीर येथील बाजार समित्या व पुणे बाजार समिती यांच्यामध्ये नव्याने खरेदीची व्यवस्था कार्यान्वित झाली आहे. जम्मू -काश्मीरप्रमाणे इतर राज्यांतील शेतमाल ई-नामद्वारे खरेदी-विक्रीबाबत कार्यवाही सुरू असल्याचे पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी सागितले.

### २१ हजार ५८२ कोटींची उलाढाल

केंद्र शासनाने शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी देशपातळीवर एक बाजार या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) ही योजना सुरू केली आहे. महाराष्ट्रासह २३ राज्यांतील तसेच ४ केंद्रशासीत प्रदेशातील मिळून देशातील १५२२ बाजार समित्या ई-नामला जोडल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील १३३ बाजार समित्या चार टप्प्यांमध्ये ई-नामला जोडल्या आहेत. राज्यात ई-नामद्वारे एकूण ५७८ लाख क्विं. शेतमालाची विक्री झाली असून याची किंमत २१ हजार ५८२ कोटी रुपये आहे.

My Pune Edition
Aug 08, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# ई-नामद्वारे पुण्यातून काश्मीरची सफरचंद, पिअर्सची खरेदी

## आंतरराज्य व्यापाराला मिळणार गती

## ११ टन फळमालाची किंमत ११.७६ लाख रुपये



**पुणे : प्रतिनिधी**

जम्मु काश्मिर येथील शोपियां या बाजार समितीमधुन ई-नामद्वारे येथील पुणे बाजार समितीमधील व्यापारी सुयोग सुर्यकांत झेंडे (श्री गुरुदेव दत्त एजन्सी) यांनी सफरचंद व पिअर या दोन शेतमालाची खरेदी केली. एकुण ११.६ टन खरेदी केली असुन या खरेदीची किंमत ११.७६ लाख रुपये असल्याचे राज्य कृषी पणन मंडळाकडून सांगण्यात आले.

ई-नाम इंटरस्टेट ट्रेडअंतर्गत दोन राज्यातील बाजार समित्यांमध्ये ई-लिलावाद्वारे शेतमालाची खरेदी-विक्री करता येते. इंटरस्टेट ट्रेडला चालना देण्यासाठी पणन मंत्री जयकुमार रावल आग्रही आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जम्मू काश्मिर येथील सफरचंद, पिअर व प्लम या शेतमालाची ई-नाममार्फत इंटरस्टेट ट्रेड करण्याबाबत कार्यवाही सुरु होती. त्या प्रमाणे पहिल्यांदा मंगळवारी (दि. ५) पुण्यात हा शेतमाल व्यापार झाला आहे. ई-नाममुळे जम्मु काश्मिर येथील बाजार समित्या व पुणे बाजार समिती यांच्यामध्ये नव्याने खरेदीची व्यवस्था कार्यान्वित झाली आहे. जम्मु काश्मिरप्रमाणे इतर राज्यातील शेतमाल ई-नामद्वारे खरेदी-विक्रीबाबत कार्यवाही सुरु असल्याचे पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी सागितले.

### राज्यात ई-नामद्वारे शेतमालाची विक्रीतून २१ हजार ५८२ कोटींची उलाढाल

केंद्र शासनाने शेतमालाच्या खरेदी विक्रीसाठी देशपातळीवर एक बाजार या संकल्पनेवर आधारीत राष्ट्रीय कृषि बाजार (ई-नाम) ही योजना सुरु केली आहे. महाराष्ट्रासह २३ राज्यातील तसेच ४ केंद्रशासीत प्रदेशातील मिळून देशातील १५२२ बाजार समित्या ई-नामला जोडल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील १३३ बाजार समित्या चार टप्यामध्ये ई-नामला जोडल्या आहेत. राज्यात ई-नाम द्वारे एकूण ५७८ लाख क्विं. शेतमालाची विक्री झाली असुन याची किंमत २१ हजार ५८२ कोटी रुपये आहे.

> कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतमालाच्या ई-नामद्वारे होणाऱ्या शेतमाल व्यापारातील विक्रीची रक्कम अडत्यांमार्फत थेट ई-पेमेंटद्वारे करण्याची सुविधा समाविष्ट आहे. त्यामुळे शेतमालाची ऑनलाइन व्यापार-व्यवहारात अधिक पारदर्शकता आली आहे. यामुळे राज्यांतर्गत व्यापार वाढीस चालना मिळाली आहे. ई-लिलावाद्वारे सोयाबीन, हरभरा, मका, गहू, ज्वारी, हळद, तूर, उडीद, कांदा, डाळिंब, कोबी, रेशीमकोष आणि फळांची विक्री होत आहे.
>
> **- संजय कदम,**
> कार्यकारी संचालक,
> राज्य कृषी पणन मंडळ, पुणे.

Sakal, 04/08/2025

सकाळ

# राष्ट्रीय बाजार समित्यांमुळे नव्या संधी

## व्यवहार अधिक खुले, पारदर्शक आणि स्पर्धात्मक बनण्याची अपेक्षा

■ **प्रवीण डोके** : सकाळ वृत्तसेवा

**मार्केट यार्ड, ता. ३ : राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याच्या हालचालींना सध्या गती मिळाली आहे. राज्य मंत्रिमंडळाने याबाबतच्या पणन सुधारणा विधेयकास मान्यता दिली आहे. राज्यपालांच्या मंजुरीनंतर त्याचे कायद्यात रूपांतर होणार आहे. या निर्णयामुळे पारंपरिक व्यापाऱ्यांना नवीन संधी मिळणार असून, स्थानिक व्यापाराच्या मर्यादा ओलांडून राष्ट्रीय व्यापारी जाळे निर्माण होणार असल्याची भावना व्यापाऱ्यांनी 'सकाळ'शी बोलताना व्यक्त केली.**

बाजार समित्यांना राष्ट्रीयीकरणाच्या कक्षेत आणण्याच्या निर्णयामुळे व्यापाऱ्यांना केवळ स्थानिक शेतकरी किंवा बाजारावर अवलंबून राहावे लागणार नाही. आता ते थेट इतर राज्यांतील शेतकरी, सहकारी संस्था किंवा औद्योगिक युनिट्सशी व्यवहार करू शकतील. यामुळे व्यवहार अधिक खुले, पारदर्शक आणि स्पर्धात्मक बनतील. व्यापाऱ्यांचा निर्णयप्रक्रियेत अधिक सक्रिय सहभाग राहील आणि बाजार समित्यांवरील त्यांचा विश्वास अधिक दृढ होईल.

### व्यापारवाढीस चालना

'राष्ट्रीय दर्जा'प्राप्त बाजार समित्यांमध्ये अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामध्ये कोल्ड स्टोअरेज, ग्रेडिंग युनिट्स, क्वालिटी टेस्टिंग लॅब, सायलो आणि डिजिटल पेमेंट प्रणालीचा समावेश आहे. हे सर्व उपाय शेतमाल साठवणूक व विक्रीसाठी उपयुक्त ठरणार असून, व्यापाराच्या गुणवत्ता प्रमाणात मोठी वाढ होणार आहे.




“ राष्ट्रीय बाजाराचा निर्णय केवळ बाजार समित्यांचा कायापालट करणारा नसून, तो एक व्यापक आर्थिक व व्यापारी दृष्टिकोनातून क्रांती घडवणारा टप्पा ठरेल. व्यापारी, शेतकरी आणि शासन यांच्यातील समन्वय वाढवून, शेतीव्यवसाय व व्यापार यांना नव्या संधी मिळतील. या योजना केवळ शेतकऱ्यांसाठी नव्हे, तर व्यापाऱ्यांसाठीदेखील क्रांतिकारी ठरतील. पारंपरिक व्यापाराला आधुनिक पर्याय उपलब्ध होतील.

- **रायकुमार नहार**, अध्यक्ष, दि पूना मर्चंट्स चेंबर

“ राष्ट्रीय बाजाराच्या योजनेची त्वरित अंमलबजावणी होणे अत्यावश्यक आहे. अन्यथा बहुराष्ट्रीय कंपन्या व ई-कॉमर्समुळे पारंपरिक व्यवसाय अजूनच मागे पडेल. राष्ट्रीय बाजार समित्यांचे उपविधी, कायदे व नियम ठरवताना महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या प्रतिनिधींना विश्वासात घ्यावे. व्यापारवाढीस पोषक निर्णय हे सर्वसमावेशक व समन्वयात्मक असणे गरजेचे आहे.

- **राजेंद्र बाठिया**, समन्वयक, महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती

“ व्यापाऱ्यांनी बाजार आवारात साठवणूक व विक्रीसाठी आवश्यक सुविधा विकसित केल्यास व्यापारवाढीला चालना मिळेल आणि शासनालाही महसूल मिळेल. शेतमालाची विक्री अधिक सुलभ आणि शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरणार आहे. राष्ट्रीय बाजाराची संकल्पना चांगली आहे. त्याची योग्य अंमलबजावणी व्हायला हवी.

- **राजेश शहा**, वरिष्ठ उपाध्यक्ष,
दि फेडरेशन ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र (फाम)

“ देशातील शेतकऱ्यांना हमीभाव आणि शेतमालाला चांगला दर मिळेल, तसेच राज्यातील बाजार समित्यांचे व्यवस्थापन अधिक सक्षम आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. राज्य सरकारच्या या पावलामुळे राज्यातील कृषी क्षेत्राच्या डिजिटल परिवर्तनाला चालना मिळणार आहे.

- **वालचंद संचेती**, अध्यक्ष,
दि फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ ट्रेडर्स (महाराष्ट्र)

### व्यवहार राष्ट्रीय स्तरावर

या बाजार समित्यांना 'ई-नाम' या राष्ट्रीय पोर्टलशी जोडले जाणार आहे. यामुळे देशभरातील व्यापाऱ्यांना एकत्रित प्लॅटफॉर्मवर व्यवहार करण्याची संधी मिळेल. व्यवहार ऑनलाइन होतील, त्याची नोंद डिजिटल स्वरूपात राहील आणि हे व्यवहार बँकांसाठी अधिक विश्वासार्ह ठरतील. यामुळे कर्जपुरवठा, जीएसटी परतावा आणि व्यवसायवाढीसाठी लागणारी आर्थिक साहाय्यात सुलभता येईल.

### या सात बाजार समित्या

राज्य सरकारने पुणे, मुंबई, नागपूर, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, सांगली या बाजार समित्यांना पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय दर्जा मिळणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

पुढारी

पुढारी ANCHOR

# राज्यात ४० बाजार समित्यांच्या शेतकरी भवन उभारणीला मान्यता

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजना अखेर कार्यान्वित | दाखल प्रस्तावांना मिळाली प्रशासकीय मान्यता

### पुढारी वॉच

**राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन बांधण्याच्या व अस्तित्वातील शेतकरी भवनच्या दुरुस्ती योजनेंतर्गत प्राप्त प्रस्तावांना अखेर राज्य सरकारकडून प्रशासकीय मान्यता मिळण्यास सुरुवात झाली आहे. पणन संचालनालय स्तरावरील छाननीअंती पाठविण्यात आलेल्या ७६ पैकी ४० बाजार समित्यांच्या शेतकरी भवनच्या प्रस्तावांना शासनाने मान्यता दिली आहे. त्यातून समित्यांना सुमारे ३२ कोटी ५१ लाख रुपयांइतके अनुदान मिळेल.**

### शासनमान्य शेतकरी भवनचे मॉडेल

शासनाने ज्या बाजार समित्यांमध्ये शेतकरी भवन अस्तित्वात नाही, तेथे शेतकरी भवन बांधण्यास शासन मान्यता आहे. त्यानुसार तळमजल्यावर बहुउद्देशीय हॉल अधिक तीन दुकाने. पहिल्या मजल्यावर चार रुम- प्रत्येकी ४ बेड व २ रुम (प्रत्येकी दोन बेडप्रमाणे एकूण २० बेड), बांधकामाचे क्षेत्रफळ ५१६३.०८ चौरस फूट, आवश्यक जमीन ४५३६.२० चौरस फुट, अंदाजित खर्च १ कोटी ५२ लाख ९१ हजार ९७० रुपये आहे.

### प्रस्ताव मंजूर झालेल्या बाजार समित्यांची नावे

अहिल्यानगर : कर्जत, जामखेड. पुणे : बारामती- सुपे. कोल्हापूर : जयसिंगपूर, वडगाव (पेठ). छत्रपती संभाजीनगर : कन्नड. जालना : घनसांगवी, वडीगोद्री. परभणी : मानवत, जिंतूर, बोरी. लातूर : औसा, देवणी, चाकूर, अहमदपूर. धाराशीव : धाराशीव. बीड : गेवराई, माजलगाव, परळी, अंबाजोगाई. नांदेड : कंधार, बिलोली. धुळे : दोंडाईचा, शिरपूर. याशिवाय चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, बुलढाणा, नागपूर जिल्ह्यातील बाजार समित्यांचे प्रस्ताव मंजूर केले आहेत.

राज्यात ३०६ बाजार समित्या आहेत. बाजार समित्यांच्या उत्पन्नाच्या वर्गवारीनुसार अ आणि ब वर्ग बाजार समित्यांना अंदाजित खर्चाच्या ५० टक्के तर क आणि ड वर्ग बाजार समित्यांना अंदाजित खर्चाच्या ७० टक्के शासन अनुदान मंजूर असून बाजार समित्यांना ते दोन टप्प्यात दिले जाणार आहे. उर्वरित निधी बाजार समित्यांना स्वनिधी, कर्जातून उभा करणे आवश्यक आहे.

कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतमालाच्या विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना तसेच, इतर बाजार घटकांना समित्यांच्या आवारात निवासाची सोय करून देणे, शेतीशी निगडित सर्व साहित्य व इतर सेवा सुविधा उपलब्ध करून देणे हा योजनेचा उद्देश आहे.

शेतकरी भवन नसलेल्या अ वर्गातील बाजार समित्यांची संख्या ४३, ब वर्गात २३, क वर्गात १८ आणि ड वर्गात ३२ आहे. त्यामध्ये अ आणि ब वर्गात शेतकरी भवनचा अंदाजित खर्च मंजूर मॉडेलनुसार १ कोटी ५२ लाख ९१ हजार हजार असून, प्रति बाजार समिती ५० टक्के मंजूर शासन अनुदान ७६ लाख ४६ हजार रुपये आहे. तर क व ड वर्ग समित्यांना १ कोटी ७ लाख ४ हजार रुपयांइतके अनुदान मिळेल.